फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

अहमदनगर जिल्हा

१९९३-९४

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

जिल्हा–अहमदनगर

१९९३–९४

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन.
मुंबई.

एस. के. ६६९५/–

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन १९९३-९४

जिल्हा - अहमदनगर

= अनुक्रमणिका =

अ. क्र.	तक्ता	विषय	पृष्ठ क्रमांक
१	२	३	४.
१.	–	दृष्टिक्षेपांत अहमदनगर जिल्हा	१
२.	–	जिल्हा संक्षिप्त ओळख.	७
	–	जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन १९९३-९४.	९
विभाग क्रमांक [एक]		सांख्यिकी तक्ते	
		क्षेत्रफळ व लोकसंख्या	
	१.१	१९९१ च्या जनगणनेनुसार तहसीलवार क्षेत्रफळ, घरे व लोकसंख्या	१
	१.२	१९५१ पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक.	३
	१.३	१९९१ च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार गावाचे तालुकावार वर्गीकरण.	६
	१.४	१९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गटानुसार शहराचे तालुकावार वर्गीकरण.	८
	१.५	१९९१ च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणारे यांची संख्या.	९
	१.६	लोकसंख्येचे [अ] वयोगटानुसार वर्गीकरण.	१२
		[ब] धर्मानुसार वर्गीकरण.	१३
	१.७	१९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची आकडेवारी.	१४
	१.८	भिंती, छपरे यासाठी वापरलेल्या साधन सामुग्रीनुसार घराचे वर्गीकरण.	१६
	१.९	आकार व मालकीच्या स्थितीनुसार ग्रामीण/नागरी क्षेत्रातील कुटुंबाचे १९९१ च्या जनगणनेनुसार वर्गीकरण.	१९
	१.१०	जनगणना घरे आणि त्यांचा वापर [१९९१ ची जनगणना]	२१
[दोन]		हवामान	
	२.१	निवडक केंद्रातील पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य	२२
	२.२	निवडक केंद्रातील कमाल व किमान तपमान.	२५
[तीन]		कृषि	
	३.१	जमिनीचा वापर.	२६
	३.२	तालुकावार निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्र.	३०
	३.३	मुख्य पिकाचे दर हेक्टरी उत्पन्न व एकूण उत्पादन.	३८
	३.४	विविध साधनांनी ओलीताखाली असलेले क्षेत्र.	४०
	३.५	निरनिराळ्या पिकाखालील ओलीताचे तालुकावर क्षेत्र.	४२

व्हि. पी.

१	२	३	५
	३.६	अ तालुकावार जिल्हा विहिरी व इतर विहिरी.	४८
	३.६	ब लूपनलिका , हातपंप आणि विद्युत पंप	५१
	३.७	विहिरीखेरीज लघुपाटबंधा-यांची कामे	५२
	३.८	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प	५४
	३.९	विहित धारण जमिनीची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ ओलीताखाली आलेली विहित धारण जमीन आणि ओलीताखालील निव्वळ क्षेत्र व वहितीच्या प्रकारानुसार आणि क्षेत्रानुसार धारण जमिनीची संख्या	५६
	३.१०	महसूलीनिहाय कुटुंबाजारे	५८
	३.११	दुष्काळ टंचाई, टंचाई सदृश्य परिस्थितीची माहिती.	५९
	३.१२	टंचाईच्या पूर्वेतिहासानुसार क्षीण व टंचाईग्रस्त भाग ठरवण्याबाबत माहिती.	६१
[चार]		पशुसंवर्धन , वने व मत्स्य व्यवसाय.	
	४.१	तालुका पशुधन	६३
	४.२	जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाची तालुकावार संख्या	६७
	४.३	विविध पशुवैद्यकीय संस्थाचे कार्य	६९
	४.३अ	रोगांच्या प्रकारानुसार पशुंच्या मृत्यूंची संख्या	७०
	४.४	मान्यताप्राप्त पशुवैद्य ग्रहे आणि प्रत्येक पशुवैद्य गृहात करत केलेल्या पशूंची संख्या.	७१
	४.५	जिल्ह्यातील वन क्षेत्र	७२
	४.६	जिल्ह्यातील मुख्य आणि गौण वन उत्पादने	७३
	४.७	जिल्ह्यातील भूजल मत्स्य व्यवसाय	७४
[पाच]		रोजगार, उद्योग खाणी व वीज.	
	५.१	कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या	७५
	५.२	चालू कारखान्यांचे कामगारांच्या संख्येनुसार उद्योग निहाय वर्गीकरण.	८३
	५.३	कामाच्या दिवसांच्या संख्येनुसार कारखान्यांचे वर्गीकरण	८७
	५.४	उद्योगांच्या महत्वाच्या बाबींची आकडेवारी. वार्षिक उद्योग पहाणी.	९०
	५,५	रोजगार विनिमय केंद्राची आकडेवारी	९२
	५.६	व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम	९४
	५.७	कर्मचारी गणना - १९९२	९५
	५.८	निरनिराळ्या उद्योगातील रोजगार	९६
	५.९	विद्युतीकरण झालेल्या शहरे व गांवाची संख्या त्याची लोकसंख्या.	९७
	५.१०	विजेचा वापर.	९९
	५.११	आर्थिक गणना १९९० विगर कृषि आस्थापना, आस्थापना व स्वकार्यरत उद्योगासह.	९९
	५.१२	प्रमुख उद्योग गटानुसार बिगर कृषि आस्थापनाची संख्या सर्वसाधारणपणे नेहमी काम करणा-या कामगारांची संख्या	१००
	५.१३	महत्वाच्या उद्योग गटानुसार बिगर कृषि आस्थापना संख्या	१०१
	५.१४	महत्वाच्या उद्योग गटानुसार, बिगर कृषि आस्थापनातील कामगारांची संख्या.	१०५

१	२	३	४
	५.१५	विगर कृषि सहकारी आस्थापना [सर्व उद्योग गट एकत्र]	१०९
	५.१६	प्रमुख उद्योग गटानुसार सहकारी औद्योगिक संस्था व रोजगार यांची संख्या.	११०
	५.१७-अ	उत्पादन व दुरुस्ती सेवा गटातील स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या.	१११
	५.१७-ब	उत्पादन व दुरुस्ती सेवा गटातील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या.	११२
	५.१८-अ	घाऊक आणि किरकोळ व्यापार गटातील स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आकारमान गटानुसार संख्या.	११३
	५.१८-ब	घाऊक आणि किरकोळ व्यापार आस्थापनांची व एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आकारमान गटानुसार संख्या.	११४
	५.१९-अ	सामुहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा स्वकार्यरत उद्योग संस्थांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या.	११५
	५.१९-ब	सामुहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा आस्थापना व उद्योग एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या.	११६
	५.२०-अ	स्वकार्यरत सर्व उद्योग गटांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या.	११७
	५.२०-ब	सर्व आस्थापना उद्योग गटांची एकूण संख्या व नेहमी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आकारमान गटानुसार संख्या.	११८
[महा]	६.१	<u>सहकार</u>	
		विविध प्रकारच्या सहकारी संस्था.	११९
	६.२	जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या संस्थांची माहिती.	१२१
	६.३	जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची लेखा परीक्षा वर्गाप्रमाणे वर्गवारी.	१२२
	६.४	जिल्ह्यातील राज्य, आणि जिल्हा पातळीवर सहकारी बँकांचे कार्य.	१२३
	६.५	जिल्ह्यातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचे कार्य.	१२४
	६.६	जिल्ह्यातील शेतकरी सेवा संस्थेचे कार्य.	१२६
	६.७	जिल्ह्यातील लॅम्पस संस्थेचे कार्य.	१२७
	६.८	जिल्ह्यातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांनी दिलेली पीक कर्जे.	१२८
	६.९	जिल्ह्यातील शेतकरी सेवा संस्थांनी दिलेली दिलेली पीक कर्जे.	१२९

नवीन /

१	२	३	४
[सहा]	६.१०	जिल्ह्यातील आदिवासी सहकारी संस्थामार्फत दिलेली पीक कर्जे.	१३०
	६.११	जिल्ह्यातील बिगर शेती सहकारी पत संस्थाचे कार्य.	१३१
	६.१२	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्था कार्य.	१३२
	६.१३	जिल्ह्यातील उत्पादक संस्था आणि सामाजिक सेवा संस्थांचे कार्य.	१३४
	६.१४	जिल्ह्यातील उत्पादक संस्था आणि सामाजिक सेवा संस्थाचे कार्य.	१३५
	६.१५	जिल्ह्यातील नियंत्रित बाजारपेठांची माहिती.	१३७
	६.१६	जिल्ह्यातील सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे.	१४१
[सात]		वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य	
	७.१	सार्वजनिक व अर्धाहार्यीत संस्थामार्फत उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांची , तालुकावार माहिती.	१४२
	७.२	नोंदणी केलेल्या जन्म व मृत्यूंची संख्या १९९२.	१४३
	७.३	विविध कारणानुसार मृत्यूंची संख्या १९९२.	१४५
	७.४	माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लसं टोचणी.	१४६
	७.५	जिल्ह्यातील कुटुंब नियोजन केंद्रांची संख्या.	१४८
[आठ]		शिक्षण	
	८.१	१९९१ जनगणनेनुसार तहसीलवार साक्षरता.	१५०
	८.२	शैक्षणिक संस्था व शिक्षकांची संख्या.	१५२
	८.३	पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची इयत्तेप्रमाणे संख्या आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वर्गवारी.	१५३
	८.४	इतर प्रकारच्या शैक्षणिक संस्था.	१५५
	८.५	आर्थिक दृष्ट्या मागासलेल्यांना दिलेली मोफत शिक्षणाची सवलत.	१५७
	८.६	प्राथमिक शिक्षणावरील खर्च.	१५८
	८.७	जिल्ह्यातील व्यवसाय मार्गदर्शन , तांत्रिक शाळा.	१५९
	८.८	जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्र	१६०
	८.९	शिक्षणाकरीता प्रशिक्षण संस्था.	१६१
[नऊ]		वाहतूक व दळणवळण.	
	९.१-अ	रेल्वे मार्गाची लांबी.	१६२
	९.१-ब	रेल्वे स्थानकाची तहसीलनिहाय यादी.	१६३
	९.२	प्रकार व पृष्ठभाग यानुसार रस्त्यांची लांबी.	१६४

१	२	३	४
[नऊ]	९.३	वापरात असलेली मोटार वाहनांची संख्या.	१६५
	९.४	महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ प्रवासी वाहतूक.	१६६
	९.५	महत्वाच्या रस्त्यावरील वाहतूक गणना.	१६७
	९.६	पोस्ट, तार, घरे, दूरध्वनी सेवा व दूरदर्शन विषयीची आकडेवारी.	१७१
[दहा]		स्थानिक संस्था.	
	१०.१	स्थानिक संस्थांचे उत्पन्न व खर्च.	१७२
	१०.२	ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च.	१७३
	१०.३	जिल्हा परिषदेचे बाबवार उत्पन्न व खर्च.	१७५
	१०.४	नगरपालिका उत्पन्न व खर्च.	१७७
[अकरा]		नियोजन	
	११.१	विविध विकास शीर्षाखाली झालेला खर्च वार्षिक योजना.	१७९
	११.२	जिल्ह्यातील सामान्य योजना/आदिवासी योजनेखालील भौतिक साध्ये.	१८२
	११.३	रोजगार हमी योजना.	१८९
	११.४	रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे/ त्यावरील रोजगार व खर्च.	१९०
	११.५	पिण्याच्या पाण्याची सोयी व टंचाईबंधी केलेल्या उपाय योजना.	१९१
	११.६	लागवडीत व अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या जाती व त्याखालील क्षेत्र.	१९२
	११.७	जिल्ह्यातील रासायनिक खतांचे वाटप.	१९३
	११.८	जिल्ह्यातील साखर कारखाने.	१९४
	११.९	दुग्ध संस्थाची माहिती.	१९५
	११.१०	अवर्षण प्रवण कार्यक्रमाची प्रगती.	१९६
	११.११	एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाची प्रगती व त्यावरील तरतूद व खर्च.	१९७
	११.१२	वीस कलमी कार्यक्रम.	१९८
	११.१३	विशेष घटक कार्यक्रम.	२००
	११.१४	जिल्ह्याचा स्थानिक विकास कार्यक्रम.	२०१
[बारा]		किंमती.	
	१२.१	निवडक शेतमालाच्या सरासरी घाऊक किंमती.	२०२
	१२.२	जिल्हा मुख्यालय, महत्वाच्या वस्तूंच्या सरासरी किरकोळ किंमती.	२०३
	१२.३	कामगारांचे ग्राहक किंमतीचे निर्देशांक केंद्र नाशिक.	२०७

१.	२	३	४
[तेरा]		संकीर्ण	
	१३. १	जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांची एकूण संख्या.	२०९
	१३. २	गुन्ह्यासंबंधी आकडेवारी.	२१०
	१३. ३	तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगार.	२११
	१३. ४	गुन्हेगारांचे वयोगटानुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण.	२१२
	१३. ५	दिवाणी व फौजदारी न्यायालयात निकालात काढलेली कामे.	२१३
[चौदा]		बँकींग व विमा	
	१४. १	वर्गीकृत बँका, त्यांच्या ठेवी व कर्जे.	२१५
	१४. २	संयुक्त भांडवली संस्था.	२१६
	१४. ३	विमा पत्रांची संख्या व रक्कम.	२१७
[पंधरा]		संकीर्ण	
	१५. १	चित्रपट गृहांची आकडेवारी.	२१८
	१५. २	अल्पबचत गुंतवणूक व खातेदारांची संख्या.	२१९
	१५. ३	तहसीलनिहाय गोळा केलेला महसूल.	२२०
	१५. ४	छापखाने, प्रकाशित केलेली वर्तमानपत्रे. आणि नियतकालिके.	२२१
	१५. ५	स्वस्त धान्य दुकानांना पुरविलेला गहू, तांदूळ व साखर.	२२२
	१५. ६	मागणी व वसूल केलेले धान्य.	२२३
	१५. ७	१९९१ लोकसभा निवडणूक व १९९० विधानसभा निवडणूक मतदानची आकडेवारी.	२२४
	१५. ८	अधिकारी व प्रवासी यांचेसाठी असलेल्या विश्रामगृहांची तालुकावार यादी.	२२७
	१५. ९	निवडक निर्देशांकाचे कल.	२३०

दृष्टिक्षेपात अहमदनगर जिल्हा.

अ. क्र.	बाब	परिमाण	जिल्हा अहमदनगर	महाराष्ट्र राज्य
१	२	३	४	५
[एक]	प्राकृतिक रचना.			
	अ] भौगोलिक स्थान			
	१. उत्तर अक्षांश	अंश	१८. २ ते १९. ९	१५. ६ ते २२. १
	२. पूर्व रेखांश	अंश	७३. ९ ते ७५. ५	७२. ६ ते ८०. ९
	ब] हवामान [१९९३]			
	१. किमान तापमान	अंश सेल्सिअस	९. ४	२. ६
	२. कमाल	-"-	३८. ०	४६. २
	३. पर्जन्य [सरासरी] १९९३	मि. मि.	६३३	उ. ना.
	क] प्रशासकीय विभाग [१९९४]			
	१. तालुके	संख्या	१३	३०३
	२. पंचायत समित्या	-"-	१३	२९९
	३. टंचाईग्रस्त तालुके	-"-	११	२२६
	४. एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प गट	-"-	१३	२९८
	५. शहरे	-"-	१३	३३६
	६. गावे एकूण [१९९१]	-"-	१५५६	४३०२७
	१] निर्जन	-"-	२	२६१५
	२] वस्ती असलेली	-"-	१५५४	४०४१२
	७. क्षेत्रफळ	चौ. कि. मी.	१७०४८	३०७७१३
[दोन]	प्रशासकीय संस्था [३१. ३. १९९४]			
	१. पंचायत समित्या	संख्या	१३	२९८
	२. महानगरपालिका	-"-	-	१२
	३. नगरपरिषद	-"-	१०	२३१
	४. कटक मंडळे	-"-	१	७
	५. ग्रामपंचायती	-"-	१२८८	२६५८४
	६. पोलीस ठाणे [३१. ३. ९३]	-"-	२४ ३८	८३३
	७. पोलीस चौकी			१४४७
[तीन]	लोकसंख्या [१९९१]			
	१. ग्रामीण लोकसंख्या	आकडे हजारात	२८३९	४८३९६
	२. नागरी लोकसंख्या	-"-	५३४	३०५५२
	३. एकूण लोकसंख्या	-"-	३३७३	७८९३८

१	२	३	४	५
तीन] पूर्व चालू]	४. अनुसूचित जातींची लोकसंख्या	आकडे हजारात	४१८	८४५८
	५. अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी.	टक्केवारी.		
	६. अनुसूचीत जमातींची लोकसंख्या	आकडे हजारात	२४०	७३१८
	७. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी.	टक्केवारी	७.३१	९.२७
	८. पुरुष	आकडे हजारात	१७३१	४०८२६
	९. स्त्रिया	आकडे हजारात	१६४२	३८११२
	१०. स्त्री-पुरुष प्रमाण	१००० पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	९४९	९३४
	११. घनता	दर चौ. किमी. क्षेत्रातील	१९८	२५७
	१२. <u>साक्षरतेचे प्रमाण [१९९१]</u>			
	१. एकूण	टक्केवारी	६१.०३	६४.८७
	२. पुरुष	-"-	७५.३०	७६.५६
	३. स्त्रिया	-"-	४५.९९	५२.३२
	४. राज्यामध्ये जिल्ह्याचा क्रमांक	संख्या	३.ना.	-
[चार]	<u>कृषि [अस्थायी]</u>		<u>९२-९३</u>	<u>९३-९४</u>
	१. भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	१७०२	३०७५८
	२. जंगलव्याप्त क्षेत्र व त्यांची भौगोलिक क्षेत्राची टक्केवारी.	-"-	१७८ [१०.४६]	५२८२ [१७.७०]
	३. <u>शेतीत उपलब्ध नसलेली जमीन.</u>			
	अ. बिगर शेती कारणाखालील जमीन.	हजार हेक्टर	८	१२२२
	ब. पडीक लागवडीलायक नसलेली [जमीन]	-"-	१२४	१७१४
	क. एकूण [अ + ब]	-"-	१३२	२९३६
	४. <u>पडीक जमीनीव्यतिरिक्त लागवडीस न केलेली इतर जमीन.</u>			
	१. कायम गुरचरण आणि इतर	हजार हेक्टर	७६	१३६३
	२. झाडे झुडपाखालील जमीन.	-"-	२८	१९०
	३. लागवडीयोग्य परंतू पड जमीन	-"-	२७	९८८
	५. <u>पडिक जमीन.</u>			
	१. चालू पड	-"-	४३	९१९
	२. इतर पड	-"-	३२	१०२६

[पुढे चालू ....]

१	२	३	४	५
६.	पिकाखालील क्षेत्र			
	१. पिकाखालील निव्वळ क्षेत्र	–"–	११४०	१८०६५
	२. दुबोटा क्षेत्र	–"–	११०	३३४०
	३. एकूण पिकाखालील क्षेत्र	–"–	१२५०	२१४०४
७.	ओलीत क्षेत्र		१९९२–९३	१९९३–९४
	१. निव्वळ ओलीत क्षेत्र	हजार हेक्टर	३२७	२५१४
	२. एकूण ओलीत क्षेत्र	–"–	३८९	३२९२
८.	महत्त्वाच्या पिकाखालील ओलीताचे क्षेत्र [अन्नधान्ये]	–"–	२७२	१७१८८
९.	वाहत धारण जमीन [१९९०–९१]	–"–		
	१. २ हेक्टर पेक्षा कमी.	हेक्टर "००	२६०७	६००२४
	२. २ ते १० हेक्टर	–"–	१९७४	३२९६८
	३. १० हेक्टर पेक्षा जास्त	–"–	११५	१७०६
१०.	जमीन महसूल वसुली [१९९३–९४]	लाख रुपये	११८	७६९१
११.	जिल्हा परिषदांचा उपकर९३–९५	हजार रुपये	१३७३३	२०१९७७
१२.	पंचायत समित्यांचा उपकर ९३–९४	–"–	२३८४	९००००
पाच]	पशुसंवर्धन [पशुगणना]		१९८७	*[१९९२ अस्थायी]
	१. पशुधन	संख्या हजारात	२३७०	३६१८६
	२. गाई व बैल	–"–	९९१	१७३०८
	३. म्हशी व रेडे	–"–	१२४	५४४०
	४. मेंढ्या	–"–	३१०	१२९५७
	५. शेळ्या	–"–	७५९	
	६. कोंबड्या व बदके.	–"–	१६९५	३०४८४
सहा]	सहकार [१९९३.–९४]			
	१. सहकारी संस्था	–"–	५७९८	१२६९९४
	२. प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था	–"–	११३९	१९८५८
	३. प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थेचे सभासद संख्या	हजारात		
	४. दुग्ध साखा संस्था [१९९३–९४]	संख्या	१२२२	१८०५३
	५. प्राथमिक कृषि पत संस्थांनी दिलेले कर्ज [१९९३–९४]	रु कोटीत	११०	९९२
सात]	जलसिंचन [३०. ६. ९४ रोजी]			
	पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्र			
	१. मोठे प्रकल्प	संख्या	२	२१
	२. लाभ क्षेत्र	हजार हेक्टर	२०८	
	३. मध्यम प्रकल्प	संख्या	७	१७६
	लाभ क्षेत्र	हजार हेक्टर	७१	२१८६

* अस्थायी आहे, ३ मोठे व मध्यम प्रकल्प – लाभ क्षेत्र

१	२	३	४	५
सात]	४. लघु प्रकल्प [पृष्ठभाग]	संख्या	९०	१७००
	लाभ क्षेत्र	हजार हेक्टर	३६	७१०
	५. सिंचन विहिरीखालील भिजणारे क्षेत्र [१९९३]	—"—	३८९	१३७३
आठ]	उद्योग [डिसेंबर १९९३ अखेर]			
	१. नोंदणीकृत कारखान्यांची संख्या	संख्या	६२५	३०००१
	२. नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या [उत्पादन चालू असलेले]	—"—	५६९	२६१०२
	३. साखर कारखान्यांची संख्या [चालू असलेले खाजगी क्षेत्र]	—"—	१४	९४
	४. साखर कारखान्यातील साखरेचे उत्पादन.	हजार टन	४९६	२९६८
	५. सर्व सुत गिरण्यांची संख्या	संख्या	३	१८८
नऊ]	वीज [३१. ३. १९९४]			
	१. वीज पुरवठा केलेली शहरे व खेडी	संख्या	१५१३	३९६६१
	२. विद्युतीकरण झालेल्या गांवाची संख्या	—"—	१५०२	३९४१३
	३. वीज पुरवठा केलेले पंप संच [१९९३-९४]	संख्या	१८३	१८२६
	४. गोबर गॅस संयंत्रे [३१. ३. ९२]	संख्या	२१३९३	४१५०१२
दहा]	सार्वजनिक आरोग्य [१९९३-९४]			
	१. रुग्णालये	संख्या	१८	८३०
	२. दवाखाने	संख्या	११	५७०२
	३. प्राथमिक आरोग्य केंद्रे	—"—	८७	१६८०
	४. प्राथमिक आरोग्य पथके	—"—	१	१५१
	५. एकात्मिक बाल विकास योजना गट.	—"—	१३	१४१
	६. अंगणवाडीत उपस्थित राहणारी	—"—	६५२२९	१०५०३०३
अकरा]	शिक्षण		३०. ९. ९३	१९९३-९४
	१. एकूण प्राथमिक शाळा.	संख्या	२६४४	६०३९७
	२. एक शिक्षकी शाळा [१९९२-९३]	—"—	६०७	
	३. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या हजारात	५५९	११२३०
	४. प्राथमिक शाळेतील शिक्षक	—"—	१२	२९५
	५. प्रत्येक शिक्षकामागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी.	संख्या	३८	३८

[पुढे चालू ..... के

१	२	३	४	५
बारा]	दुय्यम शिक्षण			
	१. दुय्यम शाळा	संख्या	४४५	११९१५
	२. शाळेतील एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	२९०	६६०२
	३. शाळेतील शिक्षक	–"–	८	२०३
	४. प्रत्येक शिक्षकामागे दुय्यम शाळातील विद्यार्थी.	–"–	३६	३३
तेरा]	उच्च शिक्षण १९९२–९३			
	१. संस्था	संख्या	२२	१२६०
	२. एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	४०	१३१९
चौदा]	अ] प्रौढ शिक्षण		९३–९४	९२–९३
	१. प्रौढ शिक्षण केंद्र	संख्या	३००	४५८२
	२. प्रौढांची उपस्थिती	संख्या हजारात	९	१३३
	ब] तांत्रिक शिक्षण [९३–९४]			
	१. औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासकीय व शासन सहाय्यित	संख्या	३	३७७
	२. इतर [खाजगी]	–"–	११	२५१
	२. शासकीय व शासन सहाय्यीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये मंजूर झालेल्या जागा.	–"–	१६४५	५८०५६
	३. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण संस्था.			
	१. शासकीय व शासन सहाय्यीत	–"–	२	७३०
	२. इतर [खाजगी]	–"–	२०	३८५२
	४. शासकीय व तांत्रिक व्यवसाय शिक्षण संस्थेची प्रवेश क्षमता.	संख्या हजारात	३	२२७
	५. अभियंत्यांची संख्या	संख्या	उ. ना.	उ. ना.
पंधरा]	परिवहन आणि दळणवळण [३१. ३. ९४]			
	१. एकूण रेल्वे मार्ग लांबी	कि. मी.	१९७	५४५९
	२. रस्त्यांनी जोडलेली गावे	संख्या	११०३	३७३९७
	३. एकूण रस्त्यांची लांबी [पृष्ठांकित]	कि. मी.	१२९०२	१४५९३७
	७. राष्ट्रीय महामार्गाची लांबी	–"–	६९	२९५३
	५. राज्य महामार्गाचे लांबी	–"–	१७२७	३१७३७
	६. महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची	–"–	२५७१	७०१७२
	७. इतर जिल्हा रस्त्यांची लांबी	–"–	३२७३	७०२७०
	८. ग्रामीण रस्त्यांची लांबी	–"–	५३०२	६५३७९

[पुढे चालू ...]

१	२	३	४	५
तेरा]	पिण्याच्या पाण्याचा पुरवठा			
	एकोण गांवाची संख्या [१.४.१९९३]	संख्या	३१७	–
	१. खेड्यांना केलेला पुरवठा [९३-९४]		अन्यायी	
	अ. नळाचा पाणी पुरवठा	संख्या	७७२	उ. ना.
	ब. कूपनलिका	संख्या	२७२	उ. ना.
	क. विहीरी	संख्या	६०	उ. ना.
	ड. विंधण विहीरी	संख्या	१८५	उ. ना.
	२. टॅंकर किंवा बैलगाडीने पुरवठा केले जाणारे गावे	संख्या	२१७	उ. ना.
	३. योजनेत समाविष्ट करावयाची गावे	संख्या	–	–
चौदा]	घर बांधणी [१९९३-९४]			
	झोपडीहीन कामगारांसाठी बांधलेल्या झोपड्या.	संख्या	–	उ. ना
पंधरा]	एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम			
	१. दारिद्र्य रेषेखाली कुटुंबे [१९८१]	संख्या	२	३७
	२. जुने लाभार्थी	लाखात संख्या	२९६७	११४०५
	३. नवीन लाभार्थी [१९९३-९४]	संख्या	७०८४	२०६२८७
एकोणीस]	रोजगार निर्मिती [१९९३-९४]			
	अ. रोजगार हमी योजना	मनुष्य दिवस	०.८३	९.७४
	ब. जवाहर रोजगार कार्यक्रम	कोटीत	०.७८	११.३०
वीस]	आदिवासी कल्याणकारी योजना १९९३-९३			
	आदिवासी करीता आश्रम शाळा	संख्या	१५	७२०
एकवीस]	मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना. [१९९३-९४]			
	अ] मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे	संख्या	११३	२४७९
	ब] वसतिगृहात रहाणारे विद्यार्थी	संख्या	५२७९	१२५९२
बावीस]	जिल्हा नियोजन [१९९३-९४]			
	१] वार्षिक योजनेतील मंजूर तरतूद	रुपये कोटीत.	३२	७५३५
	२] अनुशेष भरून काढण्यासाठी तरतूद	–"–	११	५१७
तेवीस]	नागरी पुरवठा			
	१] रास्त भावांची दुकाने [१९९३-९३]	संख्या	१५१०	७०४३९
	२] पुरवीलेल्या रकूण धान्य	"०००"टन	६५	११९१
	३] शासकीय गोदामे [३०.६.९३]	–"–	७८	१७७०
	४] साठवणीची क्षमता [३०.६.९३]	–"–	४५	११९२

टिप :- १] उ.ना. = उपलब्ध नाही.

आधार :- अर्थ संख्यकी संचालनालय, मुंबई.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन १९९३-९४

अहमदनगर जिल्हा संक्षिप्त ओळख

"संताची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा, पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७,०४८ चौ. कि. मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.५४ टक्के आहे.

या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर नाशिक व ईशान्येस औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असून दक्षिण सीमेवर सोलापूर व पश्चिम सीमेवर ठाणे व पुणे जिल्हे आहेत. महाराष्ट्रात फक्त २ जिल्हे असे आहेत की, ज्यांना ७ जिल्ह्याच्या सीमा लागून आहेत. व अहमदनगर त्यापैकी एक असून मराठवाड्यात परभणी हा दुसरा जिल्हा आहे. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची लोकसंख्या ३३.७३ लाख आहे.

पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग हे जिल्ह्याचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे तर पूर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान ६३३ मिलीमीटर इतके असूनही पर्जन्यमानाची वाटणी मात्र असमान आहे.

गोदावरी व भीमा या जिल्ह्याच्या प्रमुख नद्या आहेत. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून गोदावरी नदी वाहते. प्रवरा व मुळा या तिच्या उपनद्या आहेत. भीमा नदी जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरून वाहते. दक्षिण भागातून सीना, हंगा, घोड या नद्या दक्षिणेकडे वाहतात. काळी, लालसर-काळी, बरड व पांढरी ह्या चार प्रकारांत जिल्ह्याची जमीन विभागलेली आहे. जिल्ह्यातील १,५५६ खेडी, १३ तालुक्यात विखुरलेली आहेत. १३ पंचायत समित्या, १२८८ ग्रामपंचायती, १० नगरपालिका व १ कटकमंडळ जिल्ह्यात आहेत. याचाच अर्थ २२०५ लोकसंख्येमागे १ ग्रामपंचायत असे प्रमाण जिल्ह्याच्या ग्रामिण भागात पडते.

रब्बी ज्वारी हे जिल्ह्याचे मुख्य पीक, खरीप हंगामात बाजरी, भुईमूग, मठ मूगही पीके तर रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरबरा ही पीके घेतली जातात. ऊस हे जिल्ह्याचे प्रमुख नगदी पीक असून त्यामुळे जिल्ह्याची आर्थिक प्रगती झाली आहे. द्राक्षे, संत्री, डाळींबे इत्यादी फळांचे उत्पादनही जिल्ह्यात घेतले जाते. जिल्ह्यातील बागायत शेती प्रमुख्याने विहीरीच्या पाण्यावर केली जाते. गंगापूर, भंडारदरा, मुळा घोड, कुकडी या धरणांच्या पाटपाण्याचा ओलीताखाली जिल्ह्याने चांगला उपयोग करून घेतला असून जिल्ह्याचे ओलीताखालील क्षेत्राचे एकूण पिकाखालील क्षेत्राशी प्रमाण २६ टक्के आहे. शेती बरोबरच दुग्ध उत्पादनही अहमदनगर जिल्हा राज्यात व भारतातही अग्रणी आहे.

सहकार क्षेत्रात अहमदनगर जिल्हा प्रथम पासून अग्रेसर असून, भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना सन १९५० मध्ये प्रवरानगर येथे उभारला गेला. जिल्ह्यात १९९३-९४ या वर्षाअखेरसर्व प्रकारच्या मिळून ५,७४८ सहकारी संस्था होत्या.

उद्योग क्षेत्रात, नगर जिल्हा प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्म्याहून अधिक साखरेचे उत्पादन एकट्या नगर जिल्ह्यात केले जाते. याशिवाय औद्योगिक मद्यार्क, कागद व देशी दारू ही उत्पादने साखर उत्पादनाबरोबर घेतली जातात. "ल्यूना" मोपेड, तसेच व्हीडीओकॉन टी. व्ही. व इतर इलेक्ट्रॉनिक उत्पादनांनी भारताच्या औद्योगिक नकाशावर नगरचे स्थान निर्माण केले आहे. १९९४ अखेर जिल्ह्यात १४ साखर कारखाने व ३ सुतगिरण्या चालू होत्या. त्याचप्रमाणे एकूण ६२५ नोंदणीकृत कारखाने होते.

मार्च १९९४ अखेर विद्युतीकरण झालेल्या खेडी व शहरांची संख्या १५१३ इतकी होती. त्याचेप्रमाणे ९९ टक्के आहे. जिल्ह्यांत २२,६१९ गोबर गॅस संयत्रे कार्यरत होती.

१८ रुग्णालये, ११ दवाखाने, ८७ प्राथमिक आरोग्य केंद्रे याव्दारे जिल्ह्यांत सार्वजनिक आरोग्याची सेवा उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त सार्वजनिक क्षेत्रातील ५ प्रसूतीगृहे कार्यरत आहेत.

अंगणवाडीपासून अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत तसेच कृषि विद्यापीठापर्यंतच्या सर्व शैक्षणिक सोयी अहमदनगर जिल्ह्यांत उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील पहिले कृषि विद्यापीठ राहुरी येथे आहे. सप्टेंबर १९९३ अखेर २४५५ प्राथमिक शाळा, ४५५ दुय्यम शाळा, २२ महाविद्यालये जिल्ह्यात कार्यरत होती.

मध्य रेल्वेचा १९७ कि.मी. लांबीचा मार्ग जिल्ह्यातून जातो. सर्व प्रकारच्या १२,९०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांनी जिल्ह्यातील १,१०३ गावे जोडलेली असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे प्रवासी वाहतुकीचे विस्तृत जाळे या जिल्ह्यांत आहे. एस. टी. मार्गांची एकूण लांबी ५७७८३ कि. मी. असून एस. टी. महामंडळाच्या ६५२ एस. टी. जिल्ह्यात रस्त्यावर धावतात.

सेंट्रल बँक ऑफ इंडीया ही जिल्ह्याची अग्रणी बँक असून जिल्ह्यात २०२ व्यापारी बँकाची कार्यालये आहेत. आशिया खंडात, सहकार क्षेत्रात, प्रथम क्रमांकावर असलेल्या "अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या"व इतर सहकारी बँकेच्या ३५७ शाखा, जिल्ह्यात मार्च १९९४ अखेर कार्यान्वित होत्या. अहमदनगरची अन्नधान्याची बाजारपेठ महाराष्ट्रात प्रसिध्द आहे.

कृषि,औद्योगिक व सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केलेले, पारनेर तालुक्यांतील राळेगण शिंदी हे गांव "आदर्श खेडे" म्हणून प्रसिध्द असून भारतातील विविध राज्यातील प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते तेथे अभ्यासासाठी भेटी देत असतात.

श्री. साईबाबांची शिर्डी व अवतार मेहेरबाबाचे मेहेराबाद ही अहमदनगर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे भारतातील नव्हे जगातील अनेक भक्तांची श्रध्दास्थाने आहेत. या शिवाय श्री. ज्ञानेश्वर मंदीर, श्री. शनी शिंगणापूर व सिध्दीविनायकाचे सिध्दटेक या तिर्थ क्षेत्रांनी भावीकांच्या मनात अहमदनगर जिल्ह्याचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे.

सर्व शासकीय योजनांचा जास्तीत जास्त याचा उपयोग करुन घेवून अहमदनगर जिल्ह्यातील लोकांनी एकेकाळी दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणा-या या जिल्ह्याचा चेहरामोहराच बदलून टाकलेला आहे.

=x=x=x=x=x=x=x=x=x=

जिल्ह्याचा इतिहास :-

मलिक अहमद याने इ.स. १४९४ मध्ये वसविलेले व निजामशाहिचे राजधानीचे शहर पुढे त्याच्याच नावाने "अहमदनगर"शहर म्हणून ओळखले जाऊ लागले. जिल्ह्याचे मुख्यालय अहमदनगर शहर असल्याने, जिल्ह्याला अहमदनगर हेच नाव देण्यात आले.

पेशवाईच्या अस्तानंतर इ.स. १८२२ मध्ये अहमदनगर जिल्ह्याची निर्मीती झाली. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्याची हद्द आताच्या नाशिक जिल्ह्यातील वणी, तर दक्षिण-पश्चिम टोकास तांप्रत सोलापूर जिल्ह्यांतील करमाळ्यापर्यंत होती. १८६९ मध्ये नाशिक व सोलापूर जिल्ह्यांची निर्मीती झाल्याने वणी व करमाळा हे अहमदनगर जिल्ह्यातून वगळण्यात आले.

पुणे महसूल विभागात असलेला अहमदनगर जिल्हा, फेब्रुवारी १९८१ पासून नाशिक या नवीन महसूल विभागात समाविष्ट करण्यात आला.

१. स्थान व नैसर्गिक वैशिष्टये

१.१ स्थान :-

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी उर्ध्व गोदावरी आणि भिमा या नद्यांच्या खो-यात वसलेल्या अहमदनगर जिल्ह्याचे उत्तर अक्षांश १८°, २ ते १९°.९ व पूर्व रेखांश ७३°.९"ते ७५°.५" असे भौगोलिक स्थान आहे.

अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेस नाशिक जिल्हा, ईशान्येस विदेस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे, दक्षिणेस सोलापूर जिल्हा व पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत.

१.२ क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग :-

अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ, १७०४८ चौरस किलोमिटर असून, क्षेत्रफळाचे दृष्टीने हा जिल्हा महाराष्ट्र राज्यांत प्रथम क्रमांकावर आहे.

प्रशासकीय सोयीसाठी महसूल खात्याने जिल्ह्यातील १३ तालुक्यांची विभागणी खालीलप्रमाणे चार उपविभागात केलेली आहे.

उप विभाग		त्यात समाविष्ट केलेले तालुके
१. अहमदनगर	:	अहमदनगर, पारनेर, पाथर्डी, शेवगांव
२. कर्जत	:	कर्जत, श्रीगोंदा, जामखेड
३. श्रीरामपूर	:	श्रीरामपूर, नेवासा, राहुरी
४. संगमनेर	:	अकोले, संगमनेर, कोपरगांव

१९९१ च्या जनगणनेनुसार वरील १३ तालुक्यांत मिळून जिल्ह्यांत एकूण १५५६ खेडी असून, त्यापैकी २ खेडी "निर्जन" आहेत.

ता १५५६ गांवाची लोकसंख्या आकारमानानुसार विभागणी पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	लोकसंख्या गट	एकूण खेडी	टक्केवारी
१	० ते १४९९	९२२	५९.२५
२	१५०० ते २९९९	४०८	२६.२२
३	३००० ते ४९९९	१५३	९.८४
४	५००० ते ९९९९	५५	३.५३
५	१०००० ते १९९९९	१६	१.०३
६	२०००० चे वरील अधिक	२	०.१३
	एकूण	१५५६	१००.००

ग्रामिण विकासासाठी जिल्हा परिषद प्रशासनाखाली जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यांत १ प्रमाणे एकूण १३ पंचायत समित्या आहेत. मार्च ९४ अखेर जिल्ह्यांत १२८८ ग्रामपंचायती कार्यान्वित होत्या.

१९९१ जनगणनेप्रमाणे जिल्ह्यांत, प्रढीलप्रमाणे १३ नागरी भाग आहेत. कॅन्टोनमेंट प्रशासनाखाली, अहमदनगर कटक मंडळ अशून, १] अहमदनगर, २]राहूरी, ३]देवळाली प्रवरा, ४]श्रीरामपूर, ५]पाथर्डी, ६]श्रीगोंदा, ७] संगमनेर, ८]कोपरगांव, ९]शिर्डी, १०]राहाता, पिपंळस या नगरपालिका आहेत. याशिवाय श्रीरामपूर तेन्स टाऊन व कोपरगांव तालुक्यातील वारी हे दोन नगरपालिका नसलेले नागरी भाग आहेत. यात अ वर्ग १] अहमदनगर ब वर्ग ३] श्रीरामपूर, कोपरगांव, व संगमनेर या नगरपालिका आहेत. उर्वरित क वर्गात ६ नगरपालिका आहेत.

लोकसंख्या आकारमानानुसार नागरी केंन्द्रे :-

अ. क्र.	लोकसंख्या आकार	नागरी केंन्द्रे	नागरी केंन्द्राचा दर्जा
१	५००० ते ९९९९	२	नगरपालिका विरहित जनगणना टाऊन्स
२	१०००० ते १९९९९	३	क वर्ग नगरपालिका केंन्द्रे
३	२०००० ते ४९९९९	६	१ कटक मंडळ, क वर्ग नगरपालिका ३, ब वर्ग २ नगरपालिका.
४	५०००० ते ९९९९९	१	ब वर्ग नगरपालिका १
५	१००००० चे वर	१	अ वर्ग नगरपालिका
	एकूण	१३ केंन्द्रे	

१.३ नैसर्गिक वैशिष्टये :-

नद्या :- अहमदनगर जिल्हयाच्या गोदावरी व भीमा या मुख्य नद्या आहेत. प्रवरा ही गोदावरीची उपनदी, नेवासा तहसीलमधील टोक्याजवळ गोदावरी नदीत मिळते. मुळा ही प्रवरेची उपनदी, जिल्हयाच्या उत्तर भागातून वाहते. पुणे जिल्हयातून वाहत येणारी भीमा नदी, अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण सरहदीवरून वाहते. सीना, कुकडी, व घोड या भीमा नदीच्या उपनद्या पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तहसीलमधून वाहतात.

जमिनीच्या उंच-सखलपणानुसार अहमदनगर जिल्हयाचे पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सपाट भाग असे दोन नैसर्गिक विभाग पडतात.

सहयाद्री पर्वतरांगा अकोले तहसीलमधून जातो. सहयाद्रीचे सर्वोच्च शिखर "कळसूबाई" [१६४६ मीटर उंच] याच पर्वतराजीत विराजमान आहे.

मुळा व प्रवरा या नद्यांच्या खोऱ्यात हरिश्चंद्रगड या उपपर्वत राजीने अहमदनगर जिल्हयाचा पश्चिमेकडील भाग व्यापलेला असून बाँळेश्वर उपपर्वत राजीने पारनेर तहसीलचा काही भाग व्यापलेला आहे.

जिल्हयाच्या भूगर्भात आर्थिकदृष्टया महत्वाची खनिजे नाहीत. नगर शहराचे आसपास व पारनेर तहसीलमध्ये फक्त दुनखडी उपलब्ध आहे. बॉक्साईट व ग्रॅनाईट ही गौण खनिजे मात्र जिल्हयात विपूल प्रमाणावर उपलब्ध आहेत.

१.४ हवामान व पाऊस :-

अहमदनगर जिल्हयाचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे असून १९९२ मध्ये जिल्हयाचे कमाल तापमान ३८.० अंश सेल्सियस व किमान तापमान ९.४ अंश सेल्सियस होते.

महाराष्ट्राचा अहमदनगर जिल्हा प्रामुख्याने अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्हयाचे पर्जन्यमान अनियमित स्वरूपाचे असून पर्जन्याची वारंवारता असमान आहे.

अकोले व जामखेड तालुक्याच्या पश्चिम भागातील सरासरी पर्जन्यमान इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे. पण ते ही नियमीत नाही. १९९३ मध्ये जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान ६९३ मी.मी. होते. ही आकडेवारी पडलेला गेल्या दोन वर्षात पर्जन्यमान जास्त आहे.

१.५ जमीन :-

ज्वालामुखीच्या "लाव्हा"रसापासून संपूर्ण अहमदनगर जिल्हयाचा भूस्तर तयार झालेला असून तो "दख्खन टापू" या नावाने ओळखला जातो. जिल्हयाच्या जमिनीचे साधारणपणे तीन भाग पडतात. १] नदी काठची पोयटयाची पांढरट जमीन, २]डोंगराळ उतारावरची काळी, दगडी गोटे मिश्रीत जमीन ३]पांढरट दुनखडीयुक्त [बरड] हलकी जमीन. भूमि सर्वेक्षण विकास यंत्रणा अहमदनगर यांचेकडील माहितीनुसार

अहमदनगर जिल्हा गोदावरी भीमा व सीना यांचे खो-यातील विविध ८०/ पाणलोटक्षेत्रात विभागला आहे.

प्रवरा खो-यातील जमीन जास्त तुपिक आहे. पारनेर तालुक्याचा पुराच भाग चुनखडीयुक्त जमीनीने व्यापलेला आहे.

१.६ भूजल :-

काही ठराविक भाग वगळता, जिल्ह्यातील भूजल, घरगुती वापरासाठी व शेतीसाठी सामान्यपणे चांगल्या प्रतीचे आहे. काही भागातील भूजल, क्षारयुक्त असून ते घरगुती वापरासाठी अयोग्य आहे. २० फुटापासून २५० फूट खोलीपर्यंत भूजल उपलब्ध आहे.

२. लोकसंख्या

२.१ जनगणना व दशवार्षिक लोकसंख्या वाढ :-

१९९१ च्या जनगणनेप्रमाणे, अहमदनगर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३२, ७२, ९३५ इतकी असून त्यापैकी ८५.१८ टक्के लोकसंख्या ग्रामिण भागात व उर्वरित १५.८२ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

लोकसंख्येतील दशवार्षिक वाढ

जनगणना वर्ष	जिल्ह्याची लोकसंख्या			दशवार्षिक वाढ		
	एकूण	नागरी	ग्रामीण	एकूण	नागरी	ग्रामीण
१	२	३	४	५	६	७
१९५१	१५, १०, ८७३	१५, ८३२	११, ९६, ०४१	-	-	-
१९६१	१७, ७५, ९६९	१, ८७, ३१५	१५, ८८, ३५७	+२५.८८	- १२.८१	+ ३२.८३
१९७१	२२, ६९, ११७	२, ४१, ५००	२०, १७, ३१७	+२७.००	+ ३५.२७	+ २७.००
१९८१	२७, ०८, ३०९	३, ५१, ३६८	२३, ५६, ९५१	+१९.३६	+ ३९.७१	+ १६.८२
१९९१	३३, ७२, ९३५	५, ३३, ४८१	२८, ३९, ५५४	+२४.५५	+ ५१.८३	+ २०.४७

२.२ लोकसंख्येची घनता :-

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता प्रतिचौरस किलो मीटरला १९८ असून महाराष्ट्र राज्याची घनता प्रति चौरस कि.मी. ला. २५७ व्यक्ती आहे.

जिल्ह्यांत श्रीरामपूर तालुक्याची लोकसंख्या घनता प्रति चौ. कि.मी. ला ७२० व्यक्ती तर सर्वात कमी पारनेर तालुक्याची प्रति चौ. कि.मी. ला १९२ व्यक्ती याप्रमाणे आहे. १९९३ ची संपूर्ण जिल्ह्याची प्रक्षेपित लोकसंख्या ३५.३५ लाख इतकी आहे.

२.३ ग्रामीण व नागरी लोकसंख्या :-

१९९१ जनगणनेप्रमाणे, जिल्ह्याच्या एकूण ३३.७३ लाख लोकसंख्येपैकी २८.३९ लाख ८५.१६ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. दर गावामागे ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण १८२५ व्यक्ती इतके आहे. हेच प्रमाण श्रीरामपूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ३२२५ असून

तर्वात कमी अकोले येथे १२४१ इतके आहे. ग्रामीण लोकसंख्या सर्वाधिक संगमनेर तहसीलमध्ये तर सर्वात कमी पाथर्डी तहसीलमध्ये आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ५.३४ लाख [१५.८२] टक्के लोक नागरी भागांत राहतात. नागरी लोकसंख्या अहमदनगर शहरांत सर्वाधिक असून, सर्वात कमी वारी या सेन्सस टाऊनमध्ये आहे.

३.४ स्त्री पुरुष प्रमाण :-

१९९१ जनगणनेनुसार जिल्ह्याचे दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९७९ इतके आहे. पारनेर तालुक्यांत ते सर्वाधिक म्हणजे १०१७ इतके तर सर्वात कमी प्रमाण नगर तहसीलमध्ये ९०९ इतके आहे. याचाच अर्थ पारनेर तालुक्यातून निवडक बहिर्गत स्थलांतर उपजिविकेसाठी झालेले आहे व होत आहे.

३.५ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती :-

१९९१ जनगणनेच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ४,१८,४७९ तर अनुसूचित लोकसंख्या २,४०,३४१ इतकी असून एकूण लोकसंख्येशी या लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे १२.४१ टक्के व ७.१२ टक्के आहे.

३.६ काम करणा-यांची लोकसंख्या :-

१९९१ जनगणनेनुसार जिल्ह्यातील काम करणा-यांची लोकसंख्या १४,३२,४११ इतकी असून एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाण ४२.४७ टक्के आहे. काम करणा-या लोकसंख्येची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचा प्रकार	काम करणा-यांची लोकसंख्या	एकूण काम करणा-या लोकसंख्येशी प्रमाण
१	शेतकरी	६७८२८८	४७.३५
२	शेतमजूर	३८०९१८	२६.५९
३	पशुसंवर्धन व मेंढपाळ	२११८७	१.४८
४	खाणकाम व दगडकाम	१९५२	०.१४
५अ	घरगुती उद्योग	१९७७०	१.३८
५ब	इतर उद्योग	१०८२४५	७.५६
५क	एकूण उद्योग	१२८०१५	८.९४
६	बांधकाम	२२४६४	१.५७
७	व्यापार व वाणिज्य	७२३७०	५.०५
८	परिवहन व दळणवळण	२५९८०	१.८१
९	इतर	१०१२३७	७.०७
	एकूण काम करणा-यांची संख्या	१४३२४११	१००.००

मुख्य काम करणा-यांची एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीचा तालुकावार अभ्यास केला असता असे आढळून येते की, पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक ७६.७१४ मुख्य काम करणारे आहेत. तर सर्वात कमी टक्केवारी ३६.७९ ही श्रीरामपूर तालुक्यात आहे.

कृषि व्यतिरिक्त काम करणा-यांचे एकूण काम करणा-यांशी टक्केवारीच्या बाबतीत जिल्हा सरासरी २६.५ टक्के आहे. सर्वात जास्त टक्केवारी नगर तालुक्यात ५७.९१ तर सर्वात कमी पाथर्डीत १३.७१ इतकी आहे.

सिमांतिक काम करणा-या स्त्रियांच्या सहभाग प्रमाण सर्वात जास्त कारनेर तालुक्यांत ५२.९२% तर सर्वात कमी नगर तालुका ३२.७०% आहे.

शेती शेतमजूर व कृषि संलग्न पशुसंवर्धन या काम करणा-यांचे प्रकारात एकूण काम करणा-यापैकी ७५.५२ लोक काम करीत आहे व त्यामुळे अहमदनगर जिल्हा हा कृषि प्रधान जिल्हा आहे.

२.७ वयोगटानुसार लोकसंख्या :-

१९८१ च्या जनगणनेप्रमाणे अहमदनगर जिल्ह्याच्या २७.०८ लाख लोकसंख्येपैकी वयोगटानुसार ३९.५८ टक्के लोकसंख्या ० ते १५ वर्षे या वयोगटात, ५७.०२ टक्के लोकसंख्या १५ ते ४९ वर्षे वयोगटात आणि उर्वरित लोकसंख्या ५० ते ५९ वर्षे व त्यावरील अज्ञात वयोगटात विखुरलेली आहे. "१९९१ जनगणनेची सर्व वयोगटानुसार लोकसंख्या उपलब्ध झालेली नाही. तथापी ० ते ६ वयोगटात एकूण ६,१५,९०६ इतकी लोकसंख्या ग्रामीण भागात १९९१ जनगणनेप्रमाणे आहे.

२.८ साक्षरता :-

१९९१ जनगणनेनुसार, जिल्ह्यातील एकूण साक्षर व्यक्तींची संख्या, १६.८३ लाख असून त्याचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ६१.०३ टक्के इतके आहे. जिल्ह्यातील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी १०.६५ लाख पुरुष [७५.३० टक्के] साक्षर आहेत. तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी ६.१८ लाख [४५.९९ टक्के] स्त्रिया साक्षर आहेत. एकूण लोकसंख्येतून ० ते ६ वर्षे वयोगटाची लोकसंख्या वजा करून साक्षरता प्रमाण काढलेले आहे.

साक्षरता १९५१ ते १९९१ जनगणनेनुसार

जनगणना वर्ष	साक्षरता प्रमाण	साक्षरता प्रमाण टक्केवारी पुरुष	स्त्रिया
१९५१	१८.८०	२९.४०	७.९०
१९६१	२६.४५	३९.३६	१३.०३
१९७१	३६.२३	४८.९७	२२.९१
१९८१	४३.१६	५६.५१	२९.२४
१९९१	६१.०३	७५.३०	४५.९९

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९५१ नंतर जिल्ह्याच्या साक्षरतेच्या प्रमाणात सातत्याने लक्षणिय वाढ झालेली आहे. सर्वात जास्त साक्षरता नगर तालुक्यात ७३.७४ तर सर्वात कमी साक्षरता अकोले तालुक्यात ४९.६६ इतकी आहे.

२.९ निवासी घरे व कुटुंबे :-

१९९१ च्या जनगणनेप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील एकूण ६.०१ लाख निवासी घरामध्ये ६.२६ लाख कुटुंबे राहतात. त्यापैकी ग्रामीण भागात ५.०२ लाख निवासी घरामध्ये ५.२५ लाख कुटुंबे राहतात.

३. वने

३.१ वन व्याप्त क्षेत्र :-

१९९३-९४ या वर्षात जिल्ह्यातील एकूण १८९८ चौ. कि. मीटर म्हणजेच जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी ११ टक्के क्षेत्र वन व्याप्त आहे. या वन व्याप्त क्षेत्रापैकी २४ टक्के क्षेत्र महसूल खात्याच्या व ७६ टक्के क्षेत्र वन खात्याच्या, अधिपत्याखाली होते. एकूण भौगोलिक क्षेत्राशी वन क्षेत्राचे प्रमाण लक्षात घेतल्यास सर्वात जास्त वन क्षेत्र अकोले तालुक्यात तर सर्वात कमी वन क्षेत्र कोपरगांव तालुक्यात आहे.

३.२ वन उत्पादने :-

जिल्ह्यातील वन क्षेत्रापासून इमारती व जळावू लाकूड व बांबू ही प्रमुख उत्पादने आणि गवत, तुफ्लीपाला, कढीपत्ता, तेंदू पाने, हिरडा वगैरे गौण उत्पादने मिळतात. १९९३-९४ या वर्षात सर्व प्रकारच्या वनोत्पादनापासून ३.७० लाख रु. उत्पन्न शासनास मिळाले.

३.३ वनीकरण कार्यक्रमाचा आढावा :-

वातावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्जन्यमान वृध्दीसाठी वनविकास होणे आवश्यक आहे. संतुलित पर्यावरणासाठी ३३ टक्के जमिनीवर वनीकरण होणे आवश्यक आहे. तथापि महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी वन जमीनीचे प्रमाण हे मुलत: ३३ टक्के नाही. तेव्हा या उद्दीष्टाच्या जवळपास वन क्षेत्र वाढविणे हो काळाची गरज लक्षात घेऊन, शासन वनविकासाच्या अनेक योजना राबवित आहे.

वन विभाग :- १९९३-९४ या वर्षात वन विभागाने पश्चिम घाट विकास योजना, जिल्हा स्तर बिगर आदिवासी व आदिवासी योजना, राज्य पुरस्कृत योजनांतर्गत वनविकास, उपयुक्त झाडांची लागवड, मृदसंधारणार्थ वनिकरण, सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत वनीकरण, अभयारण्य विकास अशा अनेक योजना राबविण्यात आल्या.

सामाजिक वनीकरण :- १९९३-९४ मध्ये सामाजिक वनीकरण खात्याकडून १. सामाजिक वनीकरण रोपणी, २. अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत ५८८ हेक्टर व रोजगार हमी योजनांतर्गत एकूण ७८९७ हेक्टर क्षेत्रात वृक्ष लागवड करण्यात आली. व तीची निगा राखण्यात आली. औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागणा-या वन झाडांच्या जातीच्या लागवडीची योजना २१९ हेक्टरांमध्ये राबविण्यात आली.

४. कृषि विभाग

४.१ जमिनीचे वापरानुसार वर्गीकरण :-

जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १७.०२ लक्ष हेक्टर असून १९९२-९३ वर्षात जमिनीचे वापरानुसार क्षेत्र व त्याचे एकूण क्षेत्राशी प्रमाण खालीलप्रमाणे होते.

अ. क्र.	बाब	*क्षेत्र [हजार हेक्टर]	एकूण क्षेत्राशी प्रमाण
१	२	३	४
१	जंगलव्याप्त क्षेत्र	१७८२	१०.४७
२	शेतीस लायक नसलेले क्षेत्र	१३२५	७.७८
३	लागवड न केलेली इतर जमीन	१३०९	७.६९
४	एकूण पड [चालू व इतर]	७५५	४.३८
५	निव्वळ पिकाखालील क्षेत्र	११८५९	६९.६८
	एकूण	१७०२०	१००.००

* माहिती अस्थायी आहे.

१९९२-९३ या वर्षात एकूण पिकाखालील क्षेत्र १२,९६,३७९ हेक्टर होते. त्यापैकी निव्वळ पिकाखालील क्षेत्र ११,८५,९७२ हेक्टर व एकापेक्षा अधिक वेळा लागवड केलेले क्षेत्र १,१०,४३७ हेक्टर होते. एकूण लागवडीखालील क्षेत्राशी दुबार पिकांच्या क्षेत्राचे प्रमाण ८.५२ टक्के इतके होते.

४.२ कृषि गणना १९९०-९१ :-

कृषि गणना १९९०-९१ अनुसार जिल्ह्यांतील एकूण खातेदारांची संख्या ६,८०,६०९ असून त्यांनी धारण केलेले क्षेत्र १३,५६,३२२ हेक्टर इतके असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र राज्यांत सर्वाधिक खातेदार अहमदनगर जिल्ह्यांत आहेत.

खातेदार	संख्या	धारण क्षेत्र [हेक्टर]
१. वैयक्तिक	६६८४९३	१३१५८६१
२. संयुक्त धारण	११५०४	२७९५८
३. संस्था धारण	६१२	१२५१३
एकूण	६८०६०९	१३५६३२२

आकारमानानुसार खातेदार व त्याखालील क्षेत्र खालीलप्रमाणे :-

आकारमान	: खातेदार संख्या :	क्षेत्र (हेक्टर)
१ हेक्टरपर्यंत	२३९१५	१२७९००
१ ते १.९९ हेक्टरपर्यंत	२१३८९५	२१२७४५
२ ते ३.९९ —"—	१५७९०५	५३२५५३
४ ते ९.९९ —"—	६१५१७	३५२१६५
१० हेक्टर व त्याहून अधिक	८१३६	१३१२५९
एकूण	६८०६०९	१३५६३२८

कृषि गणना १९८५-८६ ची आकडेवारी तक्ता क्र. ३.९ मध्ये दिलेली आहे.

४.३ पीक पध्दती व व्याप्ती :-

अहमदनगर जिल्ह्यांत खरीप, रब्बी आणि उन्हाळी असे तीन कृषि उत्पादनाचे हंगाम प्रचलित आहेत.

जिल्ह्यांत खरीप हंगामात बाजरी, खरीप ज्वारी , तांदूळ, नाचणी, वरई ही धान्य पिके तूर, कुळीथ, मठ, मूग ही कडधान्ये आणि भुईमूग व सूर्यफूल ही गळीताची पिके घेतली जातात. तांदूळ व नाचणी ही पिके बहुतांशी अकोले तहसीलमध्ये घेतली जातात. रब्बी हंगामात, ज्वारी, गहू, हरभरा ही पिके घेतली जातात. त्याचप्रमाणे उन्हाळी हंगामात सामान्यपणे ज्या ठिकाणी ओलितायी व्यवस्था आहे. अशा क्षेत्रात उन्हाळी भुईमूग, मका, सूर्यफूल, भाजीपाला व चारा-याची पिके घेतली जातात.

१९९२-९३ या वर्षात, जिल्ह्याचे एकूण लागवडीखालील क्षेत्र १२, ९६, ३७९ हेक्टर इतके होते. त्यापैकी ९, ७७, ७५८ हेक्टर [७५.४३%]क्षेत्र तृणधान्याखाली, ८५, २०३ हेक्टर [६.५७ क्षेत्र] कडधान्याखाली होते. उस व गळीताच्या पिकाखालील क्षेत्र १, २३, ९५५ हेक्टर [९.५६], फळे भाजीपाला व मसाल्याच्या पिकाखाली केवळ २५, ९६६ हेक्टर [२.००] क्षेत्र होते तर उर्वरित ८३५१८ हेक्टर [६.४८%] क्षेत्र अखाद्य पिकाखाली होते.

जिल्ह्याची १९९१-९२ व १९९२-९३ या वर्षाची महत्वाच्या पिकाखालील क्षेत्राची तुलनात्मक पुढील पानावरच्या तक्त्यांत दिलेली आहे.

अ. क्र.	पीक प्रकार	पिकाखालील क्षेत्र [हेक्टर]		१९९१ च्या तुलनेत १९९२-९३ क्षेत्रात वाढ/घट	
		१९९१-९२	१९९२-९३		
१	२	३	४	५	
१.	तृणधान्ये	९१५७१६	९७७७५८	+	६.८९
२.	कडधान्ये	८३५५५	८५२०३	+	१.९७
३.	उस	७७५९७	६९९०८	-	९.९१
४.	मसाल्याची पिके	३३०५	३१८०	-	४.०४
५.	फुले व भाजीपाला	२१९९४	२२८८६	+	३.४०
६.	कपाशी व तंतुमय पिके	१२३४	१९९८	+	६१.६५
७.	गळीताची पिके	५६७६१	५४०२६	-	४.८१
८.	इतर अखाद्य पीके	६३६१३	८३५१८	+	३१.२९
	एकूण सर्व पीके	१२२२८१७	१२९६३७९	+	६.०२

१९९१-९२ च्या तुलनेत १९९२-९३ मध्ये तृणधान्ये खालील क्षेत्रामध्ये ६.८९ टक्क्यांनी, कडधान्य खालील क्षेत्रामध्ये १.९७ टक्क्यांनी , फुले व भाजीपाला पिकाखालील क्षेत्रामध्ये ३.६०, कपाशी व तंतुमय पिकाखालील क्षेत्रामध्ये ६१.६५ टक्क्यांनी इतर अखाद्य पिकाखालील क्षेत्रात ३१.२९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मसाल्याच्या, पिकाखालील क्षेत्रामध्ये ४.०४ टक्क्यांनी, उसाखालील क्षेत्रामध्ये ९.९१ व गळीताच्या पिकाखालील क्षेत्रात ४.८१ % नी घट दिसते. एकूण शेतक-यांचा कल कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याकडे दिसून येतो.

१९९१-९२ च्या तुलनेत १९९२-९३ मध्ये पाऊस जरा झाल्यामुळे एकूण पिकाखालील क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे. बागायत क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे याचे मुख्य कारण म्हणजे नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाझर तलाव, कोल्हापूर टाईप बंधा-याची कामे झालेली असल्याने बागायत क्षेत्रामध्ये वाढ झालेली दिसते.

७.४ मुख्य पिकाचे एकूण उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्न :-

अहमदनगर जिल्ह्याचे १९९३-९४ या वर्षाचे मुख्य पिकाचे उत्पादन व प्रति हेक्टरी उत्पन्न यांची सविस्तर आकडेवारी तक्ता क्रमांक ७.३ मध्ये दिलेली आहे.

१९९२-९३ या वर्षाच्या तुलनेत, गहू, ज्वारी, या प्रमुख तृणधान्याचे दर हेक्टरी उत्पन्न व एकूण उत्पादनात १९९३-९४ मध्ये लक्षणी वाढ झालेली आहे. परंतु कमी झालेल्या पावसामुळे बाजरी, तांदूळ दर हेक्टर उत्पन्न कमी झालेले आहे. कडधान्याच्या बाबतीतही तूर, उडीद, मूग व इतर कडधान्याचा दर हेक्टरी उत्पन्नामध्ये वाढ झालेली आहे. अपेक्षे पावसाचा नगदी उत्पन्नाचे ऊस, कापूस यांच्या उत्पन्नावरही परिणाम झालेला आहे.

४.५ फळ व भाजीपाला :-

महाराष्ट्र शासनाने १९८२ पासून फलोत्पादन विकास कार्यालयांची स्थापना केलेली असून त्याव्दारे शेतक-यांना फळबागा व भाजीपाला विकासाची माहिती व मार्गदर्शन आणि विविध प्रकारच्या रोपांचा पुरवठा केला जातो. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील, कुकाणा [तालुका नेवासा], श्रीरामपूर व पाथर्डी येथील फळ रोपवाटीका मार्फत शेतक-यांना मोसंबी, संत्री, डाळींब, कागदी लिंबू, पेरू, नारळ, सिताफळ, चिक्कू, आंबा व काजू इत्यादी फळ झाडांच्या रोपांचे वाटप केले जाते.

फलोत्पादनात शेतकरी आता पुढे येत आहेत. तसेच भाजीपाल्यापासून लवकर पैसा उपलब्ध होतो. त्यामुळे फळे व भाजीपाला क्षेत्र वाढत आहे. १९९२-९३ वर्षात फळे व भाजीपाला याखालील क्षेत्र २२,७८६ इतके झाले. १९९१-९२ तुलना करीता फळे व भाजीपाला याखालील क्षेत्रामध्ये ३.६० टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. जरी पावसाचे प्रमाण कमी झालेले असले तरी शासनाने सिंचनाच्या निरनिराळ्या योजना राबविल्यामुळे नगदी पिके घेण्याकडे लोकांचा कल वाढलेला दिसतो. फळबाग योजनेत शासनाने मोठ्या प्रमाणावर सहाय्य देण्याची तयारी दर्शविल्यामुळे १. वापायती रोपमळ्याचे बळकटीकरण २. गावठी बोर व आंब्याच्या झाडांचे पुनरूज्जीवन अशातारखी योजनाव्दारे शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर फायदा उठविला आहे. १९९३-९४ या वर्षात २०७६३ बोरांच्या झाडांची कलमे व २३३५६ आंब्याच्या झाडांची कलमे शेतक-यांना पुरविण्यात आली.

४.६ रासायनिक खतांचा वापर :-

जिल्हा खरेदी विक्री संघ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटया, कृषि उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य कृषि औद्योगिक विकास महामंडळ या मार्फत जिल्हयात रासायनिक खतांची विक्री केली जाते.

१९९३-९४ वर्षात विविध पिकांसाठी सर्व प्रकारची एकूण १.७८ लाख मेट्रिक टन खते वापरली गेली. १९९२-९३ या तुलनेत १९९३-९४ या वर्षातील रासायनिक खतांच्या वापरात २७ टक्क्यांनी घट झाली. कारण संदर्भ वर्षात पाऊस कमी झाल्यामुळे विहिरींना कमी पाणी आल्यामुळे उसाची लागवड कमी झाली. त्याचा परिणाम म्हणून खतांचा वापर कमी झाला.

४.७ पीक संरक्षण उपाय :-

पिकांचे विविध रोगापासून संरक्षण करण्यासाठी प्रामुख्याने किटकनाशके व बुरशीनाशक औषधे, भुकटी इत्यादीचा वापर केला जातो. १९९३-९४ या वर्षात रोप संरक्षण मोहिमेखाली २३,३३५ हेक्टर क्षेत्रावर किटकनाशक औषधांची फवारणी करण्यात आली.

४.८ कृषि मालाची साठवण व विक्री :-

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची जिल्हयात विविध ठिकाण असलेली गोदामे आणि सहकारी संस्थाची गोदामे यातून कृषि उत्पादनाची साठवण जिल्हयात केली जाते. संदर्भ वर्षात एकूण ४९३ साठवण गृहे होती व त्यांची साठवण क्षमता १,१२,५७० मे. टन इतकी होती.

जिल्हयात एकूण १२ कृषि उत्पन्न बाजार समित्या व २४ उपसमित्यामार्फत कृषि उत्पादनाची विक्री केली जाते. अहमदनगर येथील बाजार समिती जिल्हयातील सर्वात मोठी बाजारपेठ असून त्या ठिकाणी पर जिल्हयातूनही कृषि मालाची आवक मोठया प्रमाणात होते. उर्वरित ११ कृषि उत्पन्न बाजार समित्या तथा प्राथमिक बाजारपेठा असून त्या ठिकाणी प्रामुख्याने तालुक्यातील कृषि उत्पादने विक्रीसाठी आणली जातात. कृषि उत्पन्न बाजार समित्यांना नियंत्रित केलेली २१ प्रकारची विविध कृषि उत्पादने विकली गेली.

१९९४ या वर्षात, जिल्हयातील सर्व बाजार समित्यामार्फत गव्हाची ५८,८१६ मे. टन इतकी आवक झाली तर बाजरी ७१,८२२ मे. टन, ज्वारी ४७,४७९ मे. टन व तांदळाची ११,४८५ मे. टन इतकी आवक झाली. कडधान्यापैकी तुरीची आवक १७,९८१ मे. टन तर हरभ-याची १३,४१५ मे. टन, गुळाची आवक ८,३३१ मे. टन कांदा २३,२०४ मे. टन, टोमॅटो १०,३७४ मे. टन याप्रमाणे उल्लेखनीय आवक झाली तर सर्वात कमी आवक मिरचीची केवळ ३,८८७ मे. टन इतकी झाली.

४.९ क्षेत्र विकास योजना :-

१९९३-९४ या वर्षात अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमाखाली ५३० हेक्टर क्षेत्रात नालाबंडींगची कामे करण्यात आली. सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत ५८८ हेक्टर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याप्रमाणे मत्स्यविकासासाठी ९ तळी नव्याने बांधण्यात आली. वनीकरण २२०२ हेक्टर क्षेत्रात करण्यात आले.

५. जलसिंचन

५.१ जिल्हयातील जलसिंचनाची साधने ओलिताखालील क्षेत्र :-

मोठे, मध्यम व लघु सिंचनाचे प्रकल्प, उपजलसिंचन योजना व विहिरी ही जिल्हयाची जलसिंचनाची प्रमुख साधने आहेत.

जिल्हयातील उपलब्ध जलसंपत्तीच्या आजवर केलेल्या अभ्यासानुसार सर्व प्रकारचे जलसिंचन प्रकल्प व पाझर तलाव पूर्ण झाल्यावर जिल्हयातील एकूण लागवडी लायक क्षेत्रापैकी ३६ टक्के क्षेत्र ओलिताखाली आणता येईल.

१९९२-९३ या वर्षात, ३,८९,१९१ हेक्टर एकूण ओलिताखालील क्षेत्र होते. एकूण लागवडीखालील क्षेत्राशी त्याचे प्रमाण ३०.०२ टक्के इतके होते.

१९९२-९३ या वर्षात ओलिताखालील निव्वळ क्षेत्र ३,२६,७८३ हेक्टर होते. पैकी पृष्ठभागीय पध्दतीखाली १८,०५२ हेक्टर तर ठिबकिरीखाली ओलित क्षेत्र २,२८,७३१ हेक्टर इतके होते.

जिल्ह्यात रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, उन्हाळी हंगामात भूईमूग या-यांचे पिके आणि फळे व भाजीपाला हे बारमाही पिके प्रामुख्याने बागायात क्षेत्रात घेतली जातात. १९९२-९३ या वर्षात निव्वळ ओलिताखालील क्षेत्राचे एकूण पिकाखालील क्षेत्राशी प्रमाण ८३.९६ टक्के होते. ओलितखालिल ३,८९,१९१ हेक्टर एकूण पिकांच्या क्षेत्रापैकी ६२,४०८ हेक्टर [१६ टक्के] क्षेत्रात दुबार पिके घेतली गेली.

५.२ सिंचन प्रकल्प :-

अहमदनगर जिल्ह्यांतील मुळा, भंडारदरा हे मोठे प्रकल्प तसेच गंगापूर [गोदावरी उर्ध्व कालवा] जि. नाशिक, घोड, कुकडी या पुणे जिल्ह्यांतील मोठया प्रकल्पाच्या कालव्यांच्या पाण्याद्वारे जिल्ह्यातील क्षेत्र ओलिताखाली आणले जाते. या प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता २०८ हजार हेक्टर आहे. त्याचप्रमाणे पिंपळगाव आढळा, पारगांव घाटशील, मांडओहोळ, भोजापूर, माहे तांगवी व सीना या मध्यम प्रकल्पांची सिंचन क्षमता ७१ हजार हेक्टर असून एकूण ६४ लघुपाटबंधा-यांच्या विविध कामांची सिंचन क्षमता २२ हजार हेक्टर आहे.

जिल्ह्यातील लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांची कामे पूर्ण केलेली असून त्यामुळे जिल्ह्याला चांगला फायदा झालेला आहे.

६. पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय सेवा दुग्धउत्पादन

६.१ पशुधन :-

पशुधन गणना १९८७ प्रमाणे जिल्ह्यातील एकूण पशुधन २३.७० लाख होते. १९८२ च्या पशुधन गणनेच्या तुलनेत १९८७ मध्ये जिल्ह्यातील पशुधन १२.३३ टक्क्यांनी वाढले. १९८७ पशुधन गणनेनुसार, जिल्ह्यातील एकूण २३.७० लाख पशुधनाची वाटणी पुढीलप्रमाणे होती. गोजातीय ४७ टक्के , शेळ्या ,मेंढ्या ४५ टक्के, अश्वजातीय १ टक्का तर उर्वरित पशुधन ७ टक्के. राज्यात पशुधन गायी - बैल धारणेत जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो.

१९८७ पशुधन गणनेनुसार एकूण पशुधनाची प्रती चौ. कि.मी. घनता १३९ तर फक्त गोजातीय पशुधनाची घनता ६५ याप्रमाणे आहे.

६.२ पशुधन उत्पादने :-

अहमदनगर जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व कटकमंडळ हद्दीत, एकूण ७ मान्यता-प्राप्त कत्तलखाने असून १९९३-९४ या वर्षात बैल, शेळ्या, म्हशी इत्यादी एकूण २७,२३५ जनावरे मांस उत्पादनासाठी कापण्यात आली. याशिवाय जिल्ह्यात अमान्यता-प्राप्त कत्तलखान्यांत फार मोठ्या प्रमाणावर मांसासाठी शेळ्या व मेंढ्या कत्तलखान्यात फार मोठ्या प्रमाणावर मांसाठी शेळ्या व मेंढ्या कत्तलखान्यात कत्तल केलेल्या जनावरांचे अंदाजे प्रमाण ८० टक्के आहे.

अहमदनगर - पारनेर तालुक्यांत "ॲग्रीटेक हॅचरिज "या प्रकल्पातर्गत दररोज १० हजार पक्षांचे कुक्कूट मांस उत्पादित केले जाते. उत्पादित कुक्कूट मांस दररोज मुंबईत विकले जाते याशिवाय काही प्रमाणात ते आखाती देशातही निर्यात केले जाते. तसेच जिल्हयातून फार मोठ्या प्रमाणावर कोंबड्या व त्यांची अंडी यांची विक्री मुंबई व परप्रांतात केली जाते.

शेळीपालन प्रकल्प :-

नगर तालुका कार्यक्षेत्र असलेल्या किसान क्रांती शेळी पालन सहकारी संस्थेचे ८५० सभासद होते. संस्थेने बंदिस्त शेळी पालनाचे ८ फॉर्म सुरु केले असून मोठ्या प्रमाणावर शेळी पालन फार्मस सुरु करण्यांत येणार आहेत.

याशिवाय जिल्हयातील लहान जनावरांची ओली कातडी परप्रांतांत विकली जाते. तर जिल्हयांतर्गत मोठ्या जनावरांच्या कातडीचा व्यापार केला जातो.

६.३ दुग्धोत्पादन :-

दुग्धोत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. दूध उत्पादन केवळ पूरक व्यवसाय नव्हे तर अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना ते एक वरदानच ठरले आहे.

